PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie
* Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos
* Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters
* Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali
Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
B'Live® SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
Delightful delicacies!
B'Live Restaurant
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768
Also available on zomato SWIGGY

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३१७ ■ गुरूवार २० ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

।। श्री गणेशाय नमः ।।
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स

जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

## बिहार विद्यार्थी आंदोलन गोळीबारावरून राजद आक्रमक
## तेजस्वी यादवांचा राजभवनावर मोर्चा; पोलिसांची धावपळ

**पाटणा, दि. १९ : बिहारमधील सिवान येथे विद्यार्थी आंदोलन दरम्यान झालेल्या एके-४७ गोळीबाराच्या घटनेवरून राजकीय वातावरण तापले आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी राष्ट्रीय जनता दलाचे (राजद) नेते आणि बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव आज रस्त्यावर उतरले. त्यांनी पाटणातील जेपी गोलंबर येथून राजभवनाच्या दिशेने मोर्चाचे नेतृत्व केले. या मोर्चात सुमारे पाच हजारांहून अधिक राजद समर्थक सहभागी झाल्याचा दावा करण्यात आला. डाक बंगला परिसरात आंदोलकांनी बॅरिकेड्स तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी इन्कम टॅक्स चौक परिसरात पाण्याचे फवारे मारले. त्यानंतर तेजस्वी यादव यांच्यासह काही आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले.**

सिवानमधील घटनेवरून तेजस्वी यादव यांनी बिहार सरकारला लक्ष्य केले. या गोळीबाराचा आदेश नेमका कोणी दिला, हे सरकारने जनतेसमोर स्पष्ट करावे, अशी मागणी त्यांनी केली. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी घटनेची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कारवाई करावी, तसेच विद्यार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.जोपर्यंत सरकार जबाबदारी निश्चित करत नाही, घटनेबाबत स्पष्ट निवेदन जारी करत नाही, दोषींवर कारवाई होत नाही, गोळीबाराचा आदेश कोणी दिला हे जनतेसमोर येत नाही आणि विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तोडगा निघत नाही, तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहील, अशी भूमिका तेजस्वी यादव यांनी मांडली.

**पोलिसांकडून पाण्याचा मारा**

मोर्चा दरम्यान काही आंदोलकांनी पोलिसांच्या दिशेने पाण्याच्या बाटल्या फेकल्याची माहिती समोर आली. काही कार्यकर्ते लाकडी एके-४७ च्या



प्रतिकृती घेऊन आंदोलनात सहभागी झाले होते. दरम्यान, पाटणाचे आयजी जितेंद्र राणा यांनी पोलिसांनी आंदोलकांवर बळाचा वापर केला नसल्याचे स्पष्ट केले. राजभवन मोर्चा गांधी मैदानापासून सुरू झाला आणि इन्कम टॅक्स चौकात थांबवण्यात आला. आंदोलकांच्या प्रतिनिधी मंडळाला लोक भवन येथे भेटीची वेळ देण्यात आली असून तेथे त्यांच्या (पान २ वर)

## तिसऱ्या अपत्यासाठीही एक वर्षाची मातृत्व रजा



चेन्नई, दि. १९ : तामिळनाडू सरकारने सरकारी महिला कर्मचाऱ्यांना तिसऱ्या अपत्यासाठीही आता ३६५ दिवसांची मातृत्व रजा देण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्या नेतृत्वाखालील सरकारने हा निर्णय घेतल्याची माहिती राज्याचे मानव संसाधन मंत्री डी. सार्थककुफर यांनी विधानसभेत दिली.सध्या राज्यातील सरकारी विवाहित महिला कर्मचाऱ्यांना पहिल्या दोन अपत्यांसाठी ३६५ दिवसांची मातृत्व रजा मिळते. मात्र दोनपेक्षा अधिक अपत्यांच्या बाबतीत आतापर्यंत बारा आठवडे म्हणजेच ८४ दिवसांची रजा लागू होती. आता तिसऱ्या अपत्यासाठीही ३६५ दिवसांची (पान २ वर)

## मनपाचे एकशे छत्तीस बदली सफाई कामगार कायम होणार
## आमदार अनुप अग्रवाल यांच्या पाठपुराव्याला मिळाले यश

### उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यासोबत आ.अनुप अग्रवालांच्या बैठकीतील निर्णय

**धुळे, दि.१९- येथील महापालिकेत तब्बल ३० ते ३५ वर्षांपासून कार्यरत बदली सफाई कामगारांना मंजूर व रिक्त पदांवर कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याविषयीच्या निर्णयाला मंगळवारी (ता.१८) राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिरवा कंदील दाखवत शिक्कामोर्तब केले. या संदर्भात धुळे शहराचे आ.अनुप अग्रवाल यांनी सतत वर्षभरापासून उपमुख्यमंत्री शिंदे तसेच नगरविकास विभागाकडे पाठपुरावा सुरू ठेवला होता. याबाबत मंगळवारी दिलासादायक निर्णय झाल्याने आ.अग्रवाल यांनी उपमुख्यमंत्री**



**शिंदे यांचे आभार मानले आहेत.**

येथील महापालिकेत सुमारे १३६ बदली सफाई कामगार असून, ते ३० ते ३५ वर्षांपासून सेवेत कार्यरत आहेत. या कामगारांनी काही महिन्यांपूर्वी आ.अनुप अग्रवाल यांची भेट घेत त्यांना महापालिकेच्या सेवेत कायम करण्याविषयी निवेदन देत विविध समस्या मांडल्या होत्या. त्या अनुषंगाने या बदली सफाई कामगारांना धुळे महापालिकेतील रिक्त व मंजूर पदांवर कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्यात यावे, अशी विनंती आमदार अग्रवाल यांनी केली होती. त्या संदर्भात नगरविकास विभागाकडे दिलेल्या प्रस्तावात बहुतांश कामगारांनी वयोमर्यादा ओलांडली असून, त्यांच्या आजपर्यंत केलेल्या सेवेचा विचार करून त्यांना विशेष बाब म्हणून त्यांची शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व आस्थापना खर्चाबाबतच्या अटींमध्ये शिथितला देऊन निर्णय घेण्याबाबत विनंती केली होती. त्यासाठी आमदार अग्रवाल यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकासमंत्री (पान ४ वर)

## सोशल मीडियावर ग्रा.पं.अधिकारी व सरपंचांची खोटी माहिती प्रसारित करणाऱ्यांवर कारवाई करा

**धुळे, दि.१९- सोशल मीडिया, विशेषतः इंस्टाग्रामवर ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांच्याबाबत कोणतीही शहानिशा न करता चुकीची अथवा खोटी माहिती प्रसारित करणाऱ्या व्यक्ती आणि ग्रुप डमिनवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पंचायत राज विकास मंच तथा अखिल भारतीय सरपंच परिषदेचे धुळे जिल्हाध्यक्ष राजेश गुलाबराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

याबाबत निवेदनात म्हटले



आहे की, सध्या सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळविण्यासाठी काही जण कोणत्याही विषयाची सविस्तर माहिती न घेता रील्स तयार करून प्रसारित करीत आहेत. अनेकदा संबंधित कागदपत्रांची पूर्ण पडताळणी न करता तसेच वस्तुस्थिती जाणून न घेता व्हिडिओ तयार केले जातात. अशा प्रकारच्या चुकीच्या माहितीमुळे गावागावात ग्रामसभा, बैठका आणि इतर सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये गैरसमज निर्माण होऊन वादाचे प्रसंग उद्भवत आहेत. या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यातील (पान ४ वर)

## विजय चौधरी यांना जामीन मंजूर

नंदुरबार, दि.१९(प्रतिनिधी)- नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ६९९/२०२६ ऑडिओ क्लिप प्रकरणात विजय वसंत चौधरी यांचा जामीन अर्ज नंदुरबार सत्र न्यायालयाने मंजूर केला आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. उगले यांनी १९ ऑगस्ट २०२६ रोजी हा आदेश दिला. न्यायालयाने ५०,००० रुपये च्या वैयक्तिक जातमुचलक्यावर तसेच त्याच रकमेच्या एका जामीनदारावर चौधरी यांची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच आरोपपत्र दाखल होईपर्यंत दर रविवारी दुपारी १२ ते ३ या वेळेत नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात हजेरी लावण्याची अट घालण्यात (पान ४ वर)

## नेवाडे गावाच्या रस्त्यासाठी ग्रामस्थ आक्रमक
## सार्वत्रिक निवडणुकीवर बहिष्काराचा इशारा

**धुळे, दि.१९- शिंदखेडा तालुक्यातील मौजे नेवाडे गावाला जोडणाऱ्या प्रमुख रस्त्याचे रखडलेले काम तातडीने सुरू करून रस्ता सुस्थितीत करावा, या मागणीसाठी ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मागणीची दखल न घेतल्यास येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा देत ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन साद केले. तसेच कार्यालयाबाहेर निदर्शने करून प्रशासनाचा निषेध केला.**

नेवाडे गावाला शिंदखेडा



येथे ये-जा करण्यासाठी वरपाडे रस्त्यापासून नेवाडे गावापर्यंत तसेच सोनेवाडी रस्त्यापासून नेवाडे गावापर्यंतचा रस्ता हा प्रमुख मार्ग आहे. या रस्त्याची लांबी सुमारे ४.२३५ किलोमीटर असून मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत या रस्त्याच्या दर्जोन्नतीचे काम मंजूर करण्यात आले आहे. या कामाचा कार्यारंभ आदेश १ फेब्रुवारी २०२४ रोजी देण्यात आला असून, आदेशानुसार काम १८ महिन्यांच्या आत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, मुदत उलटूनही रस्त्याचे काम अद्याप प्रलंबित असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. रस्त्याचे काम मंजूर असून (पान ४ वर)

## केबल चोरणारे तिघे दोंडाईचामध्ये अटकेत

धुळे, दि.१९- वरवाडे शिवारातील शेतातून केबल चोरून नेणाऱ्या तीघांना दोंडाईचा पोलिसांनी अटक केली. मोटर सायकल, केबल असा एक लाख १३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.शिंदखेडा तालुक्यातील वरवाडे शिवारात इंद्रसिंग खंडु गिरासे (वय ४८ , रा.वणी ता. शिंदखेडा) यांच्यासह अन्य एका शेतकऱ्याचे शेत आहे. शेतातील विहिरीवरून चोरट्यांनी १४ हजार रुपयांची तांब्याची तार चोरुन नेली. १४ ऑगस्टला सकाळी चोरीचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी दोंडाईचा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. दोंडाईचा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिनेश सोनवणे यांना मिळालेल्या (पान ४ वर)

## नंदुरबारला विशेष कॉम्बिंग मोहीम
## बारा जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी) - नंदुरबार शहरातील बसस्थानक परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच टवाळखोरी, संशयास्पद प्रकार आणि अनुचित घटनांना आळा घालण्यासाठी नंदुरबार पोलिसांकडून विशेष कॉम्बिंग मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण १२ इसमांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.**

जिल्हा पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. नंदुरबार शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप पाटील तसेच वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार खेडकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी बसस्थानक परिसराची पाहणी केली. कॉम्बिंग मोहिमेदरम्यान टवाळखोरी करणाऱ्या तसेच संशयास्पद हालचाली करणाऱ्या व्यक्तींवर पोलिसांनी कारवाई केली. यामध्ये ९ पुरुषांविरुद्ध सार्वजनिक ठिकाणी विनाकारण टवाळखोरी करून शांततेचा भंग करण्याच्या अनुषंगाने, तर ३ महिलांविरुद्ध रस्त्यावर अश्लील हावभाव करून लोकांना आकर्षित करण्याचा प्रयतक केल्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.

बसस्थानक परिसरात वारंवार होणारी वाहतूक कोंडी दूर करण्यासाठीही पोलीस प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. अनधिकृतपणे उभे राहणारे वाहनचालक तसेच टॅक्सीचालक यांची बैठक घेऊन वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.नंदुरबार जिल्ह्यातील नागरिकांनी वाहन चालविताना वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन नंदुरबार पोलिसांकडून करण्यात आले आहे.



## जवाहर मेडीकलला डाऊन सिंड्रोम डोळ्याच्या रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रीया

**धुळे, दि.१९- डोळ्याच्या डाऊन सिंड्रोम असलेल्या रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रीया केल्याने दृष्टीआड गेलेली सृष्टी पाहण्याचा आनंद आता त्यांना घेता येणार आहे. ही किमया खान्देशातील आरोग्यतिर्थ असलेल्या जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडीकल कॉलेज आणि हॉस्पीटल मोराणे प्र.ल.च्या तज्ञ डॉक्टरांनी करुन दाखविली आहे. त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.**

जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडीकल कॉलेज आणि हॉस्पीटल हे खान्देशातील (पान ४ वर)

## शहादा न.पा.च्या सर्वसाधारण सभेत चोवीस विषय मंजूर
## दोन विषय नामंजूर; पाणीपुरवठा मुदतवाढ विषय स्थगित

**शहादा, दि.१९ (का.प्र.)- शहादा नगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवारी दुपारी साडेतीन वाजता नगरपालिकेच्या काशिनाथ सजन पाटील सभागृहात शांततेत, मात्र प्रशासनाला विविध नागरी प्रश्नांवरून जाब विचारत पार पडली.सुमारे अडीच तास चाललेल्या या सभेत विषयपत्रिकेवरील एकूण २७ विषयांपैकी दोन विषय नामंजूर करण्यात आले, तर एक विषय स्थगित ठेवण्यात आला. उर्वरित २४ विषयांवर सविस्तर चर्चा होऊन त्यांना सर्वानुमते**



**मंजुरी देण्यात आली.**

सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष अभिजीत पाटील होते. तर उपनगराध्यक्ष माधवी मकरंद पाटील व मुख्याधिकारी साजिद पिंजारी यांची प्रमुख उपस्थिती होती.महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत शहादा शहर वाढीव पाणीपुरवठा योजना टप्पा- कामास आणि मक्तेदाराच्या मागणीनुसार मुदतवाढ देण्याचा विषय यावेळी स्थगित ठेवण्यात आला. याशिवाय शहादा नगरपालिका हद्दीतील उपलब्ध जागा सामाजिक वनीकरण (पान ४ वर)

## नवापूरातील खुल्या जागांवर वृक्षलागवड करणार
## नगराध्यक्षांसह अधिकाऱ्यांनी केली प्रत्यक्ष पाहणी

**नवापूर, दि.१९ (प्रतिनिधी) - नवापूर नगरपालिका हद्दीतील विविध कॉलनी व परिसरातील मोकळ्या जागांचा पर्यावरणपूरक विकास करण्याच्या दृष्टीने सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात येणार आहे. यासाठी शहरातील गणेश हिल, आदर्श नगर, वेडूभाई गोविंदभाई नगर, लकी पार्क, आयडीआय परिसर यासह विविध भागांतील खुल्या जागांची पाहणी करण्यात आली.**

या पाहणीदरम्यान लोकनियुक्त नगराध्यक्ष जयवंत जाधव, मुख्याधिकारी डॉ. मयुर पाटील, लागवड अधिकारी(वनक्षेत्रपाल) शुभम इंगळे, प्रकल्प अधिकारी प्रशांत भट, सहायक रचनाकार तुषार अहिरे आदी उपस्थित होते. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रस्तावित वृक्षलागवड क्षेत्रांची पाहणी करून उपलब्ध जागा, वृक्षलागवडीचे नियोजन तसेच भविष्यातील विकासाच्या दृष्टीने आवश्यक बाबींची माहिती घेतली.



शहरातील मोकळ्या जागांवर विविध जातींच्या वृक्षांची लागवड करण्यात येणार असून, लागवड केलेल्या वृक्षांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी संबंधित जागांना कंपाऊंड करण्यात येणार आहे. त्यामुळे वृक्षांची सुरक्षितता राखण्यासोबतच या परिसराचा विकास होऊन नागरिकांसाठी स्वच्छ व हिरवाईने नटलेले वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे.मृदा संधारण व पर्जन्य जलसंधारण होण्यास मदत होणार आहे. (पान ४ वर)

## शेतकऱ्याच्या पिशवीतून पन्नास हजार लांबविले

साक्री, दि.१९(प्रतिनिधी)- साक्री शहरातील बडोदा बँकेत शेतमाल विक्रीतून मिळालेले ५ लाख ८० हजार रुपये खात्यात जमा करण्यासाठी आलेल्या ७० वर्षीय शेतकऱ्याच्या पैशांपैकी ५० हजार रुपये लंपास केल्याची घटना १८ ऑगस्ट रोजी सायंकाळी घडली. प्लास्टिकच्या पिशवीला कापून त्यातून रोख रक्कम काढून घेण्यात आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. १८ ऑगस्ट रोजी दुपारी शेतातील कांद्याचे पैसे मिळाल्यानंतर सुमारे ५ लाख ८० हजार रुपये बडोदा बँक,साक्री येथे खात्यात भरण्यासाठी आले होते.त्यांनी ही रक्कम (पान ४ वर)

## नंदुरबारमध्ये गणेशोत्सवासाठी पोलिसांचा ॲक्शन प्लॅन
## मंडळांनी नियमांचे पालन करावे; प्रशासनाचे आवाहन

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी) - आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नंदुरबार जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हा पोलीस दल सज्ज झाले असून, गणेश मंडळांनीही प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांनी केले. गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी १८/०८/२०२६ रोजी नंदुरबार येथील भारतरत्न श्री. अटल बिहारी वाजपेयी हॉल, जुनी नगरपालिका येथे शांतता समितीची बैठक घेण्यात आली. बैठकीस जिल्हाभरातील सुमारे ७० ते ८० गणेश मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व पदाधिकारी तसेच प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

जिल्हा पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत गणेशोत्सव काळातील सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन, मिरवणुकीचे मार्ग, गर्दीचे नियंत्रण आणि ध्वनीप्रदूषण यासह विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. गणेश विसर्जन मिरवणूक पारंपरिक मार्गानेच काढावी. मिरवणुकीच्या मार्गात कोणताही बदल करू नये तसेच प्रशासनाने निश्चित केलेल्या वेळेचे काटेकोरपणे पालन करावे, अशा सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी (पान ४ वर)

## ना.रावलांच्या उपस्थितीत उद्या महावॉकॅथॉन

धुळे, दि.१९- पाणी अडवा, पाणी जिरवा हा मूलमंत्र देत राज्यात जलसंधारणाची मोठी चळवळ माजी मुख्यमंत्री सुधाकररावजी नाईक यांनी उभी केली. त्यांच्या जलसंधारण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यामुळे त्यांचा जन्मदिवस २१ ऑगस्ट हा जलसंधारण दिन म्हणून राज्यात साजरा करण्यात येणार असून कार्यक्रमासाठी राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री (पान ४ वर)

## गणेशोत्सवासाठी महापालिकेची यंत्रणा झाली सज्ज
## आयुक्तांकडून विभाग प्रमुखांना मार्गदर्शक सूचना

**धुळे, दि.१९- आगामी गणेशोत्सव उत्साहात, आनंदात आणि शांततामय वातावरणात साजरा व्हावा तसेच गणेशभक्त व नागरिकांना आवश्यक त्या नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी धुळे महानगरपालिकेची यंत्रणा सज्ज करण्यात येत आहे. या अनुषंगाने मनपा आयुक्त नितीन कापडणीस यांनी सर्व विभागप्रमुखांची बैठक घेऊन गणेशोत्सवाच्या अनुषंगाने कामकाजाचा आढावा घेतला.**

आयुक्तांच्या दालनात घेण्यात आलेल्या बैठकी प्रसंगी अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उपायुक्त हेमंत निकम, मनोज वाघ, शहर अभियंता सी.एम. उगले, सहायक आयुक्त श्रीमती सोनाली देवरे, सागर जकातदार, राजेंद्र माईनकर, किशोर वाघ, किशोर शिंदे, सहायक आरोग्याधिकारी राजेश वसावे, लक्ष्मण पाटील, विद्युत विभागाचे अधिकारी पराग ठाकरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत गणेश विसर्जन मार्गावरील खड्डे बुजविणे, रस्ते दुरुस्ती करणे, कृत्रिम विसर्जन तलाव उभारणे, विसर्जन मार्गावरील अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करणे, धोकादायक विद्युत व्यवस्था सुस्थितीत करणे तसेच विसर्जन स्थळे व कृत्रिम तलावांच्या ठिकाणी आवश्यक विद्युत व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

गणेशोत्सव काळात सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवून ते नियंत्रण कक्षाशी जोडणे, विसर्जन मार्ग अतिक्रमणमुक्त (पान २ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,43,350 रु.+3% GST
सोने- 24 K -1,56,500 रु.+3% GST
चांदी- 2,39,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३




## महिंदळेतून पाईप चोरणाऱ्या संशयितास मुद्देमालासह धुळ्यात ठोकल्या बेड्या

**धुळे, दि.१९- महिंदळे शिवारातून जलवाहिनीचे पाईप चोरी प्रकरणी एका संशयीताला धुळे तालुका पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून तीन लाखांचे पाईप जप्त करण्यात आले असून चोरी गेलेल्या उर्वरित पाईपचाही शोध सुरू आहे.**

महिंदळे शिवारातील हॉटेल नवनाथ शेजारी मोकळया जागेवरुन फिर्यादी पंकज महादु शिंदे, (रा. नाशिक) यांच्या मालकीचे एकुण ५ लाख रुपये किंमतीचे पाण्याचे पाईप चोरीस गेले. बारा ऑगस्टला ही घटना उघडकीस आली. (पान ४ वर)

१५ वे पुण्यस्मरण



स्व.डॉ.वसंत भास्करराव विसपुते
(मृत्यू दि.२०/०८/२०११)

१५ वर्षे झाली मित्रा जग सोडून जाण्याला
पदोपदी आठवण येते
आजारपणात, तूच होता आधाराला.
गरीब श्रीमंत जात-पात, याला तुझ्याकडे नव्हता थारा
किंमत जपली माणुसकीची,
हाच स्वभाव तुझा न्यारा!

-: श्रद्धावनत :-
समस्त मित्र परिवार, धुळे

# आपला महाराष्ट्र

## साने गुरूजींच्या सहवासातील अखेरचे सैनिक

खान्देश म्हटले की,साने गुरूजींची प्रतिमा ताबडतोब समोर येते.त्याच प्रमाणे अमळनेरचे नाव घेतले की,गुरूजीच सर्व प्रथम आठवतात.अमळनेरची आणखी ओळख म्हणजे त्यागमूर्ती संत सखाराम महाराज,मंगळ ग्रह मंदिर,प्रताप महाविद्यालय, तत्वज्ञान केंद्र,विप्रो आणि अलीकडील ओळख साने गुरुजी स्मारकाची आहे.प्रताप हायस्कूल मध्ये साने गुरूजींचा सहवास बालपणी लाभलेले अनेक विद्यार्थी होते.गुरूजींच्या परीस स्पर्शाने पावन झालेल्या आणि वैचारिक दृष्ट्या विकसित झालेल्या त्या पिढीच्या मालिकेतील प्राचार्य अरविंद सराफ सर अखेरचे असावेत.परवा त्यांचे वार्धक्याने वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले एकोणनव्वद वर्षांचे आयुष्य म्हणजे ते परिपूर्ण जगले असे म्हणता येईल.तरीही त्यांचे जाणे हे एका नैतिक उंचीच्या व्यक्तिमत्वाचे आणि मार्गदर्शकांचे जाणे होय.त्यांच्या समकालीन प्रताप महाविद्यालयातील त्याचबरोबर सामाजिक व राजकीय क्षेत्रातील गुलाबराव बापू पाटील,पन्नालाल जैन, आर.के.पाटील,डॉ. प्रभाकर म्हसकर,वा.रा.सोनार,भगवान सिंग कालरा,गांधलीकर सर आदींपैकी कोणीच आज हयात नाहीत.त्यांच्यातील शेवटचा दुवा सराफ सरांच्या निधनाने निखळला आहे. त्यांच्या रूपाने अमळनेरातील दोन पिढ्यांचा मार्गदर्शक हरपला.ते प्रताप महाविद्यालयात शिकले,त्याच महाविद्यालयात प्राध्यापक, उपप्राचार्य,प्राचार्य,एन. सी. सी. चे प्रमुख झाले.त्यांची कारकीर्द विद्यार्थी प्रिय,शिस्तप्रिय व पर्यावरण प्रेमी शिक्षक म्हणून अनेकांच्या आठवणीत कायमची असेल असाच त्यांचा कालखंड होता.

समाजात सध्या कुणाची कमतरता असेल तर ती आचार्यांची आहे.मात्र सराफ सरांची पिढी आचार्य या संकल्पनेला साजेशी होती. त्यांचे संपूर्ण जीवन आचार्यांच्या भूमिकेला समर्पित होते.त्याद्वारे असंख्य विद्यार्थी त्यांनी घडविले.त्यांच्यावर झालेला शिस्तीचा आणि कर्तव्य परायणतेचा संस्कार अनेकांची जीवने घडविणारा ठरला.देशातील महत्वपूर्ण आणि दुर्मीळ असलेले मंगळग्रहाचे मंदिर त्यांनी उजेडात आणले.आजच्या त्या देवस्थानच्या प्रसिध्दीच्या मुळाशी सराफ सरांची कर्तबगारी आहे.या मंदिरात साने गुरूजींचे स्मरण म्हणून उभे असलेले प्रवेशद्वार सरांच्या कल्पकतेचे प्रतीक आहे.तिथे वाढलेली झाडी, हिरवळ असेल ,प्रताप महाविद्यालयाच्या आवारातील झाडे असतील,किंवा साने गुरुजींच्या स्मारकाच्या परिसरातील वृक्षराजी असेल या सर्व ठिकाणी सराफ सरांच्या कर्तबगारीच्या पाऊलखुणा आहेत.पर्यावरणासंबंधीचे त्यांचे प्रेम सर्वश्रुत होते.मुला प्रमाणे वृक्षांवर त्यांनी प्रेम केले.पर्यावरण प्रेमी साने गुरुजी असे एक पुस्तकही लिहिले.त्यात गुरूजींच्या अनेक आठवणी आहेत.

साने गुरुजींनी सन १९४५ मध्ये आपल्या लेखनातून आणि विचारातून अंतःकरणातील तळमळ व्यक्त केली होती. सभोवतालचा सारा संसारमाणसांचे आणि समाजाचे जीवन सुखी, समृद्ध, ज्ञान–विज्ञानाने संपन्न, कलामय, सामर्थ्यशाली आणि परस्पर प्रेमाने ओतप्रोत व्हावे, हीच त्यांच्या मनातील आकांक्षा होती. ही केवळ सामाजिक परिवर्तनाची इच्छा नव्हती, तर ती त्यांनी ईश्वराचरणी केलेली मनःपूर्वक प्रार्थनाच होती. माणसाचे जीवन अधिक सुंदर, अर्थपूर्ण आणि प्रेममय व्हावे, यासाठीच त्यांचे सारे लेखन, विचार आणि जीवनकार्य होते. तद्वतच सराफ सरांनी यावर हुकूम जगण्याचा प्रयत्न केला.सार्वजनिक जीवनात चारित्र्य फार महत्वाचे असते.आपण पारदर्शक नसलो तर लोक आपल्याला अजिबात थारा देत नाहीत.लोक स्वतःकसेही असोत किंवा वागोत संस्था,संघटनेत सार्वजनिक जीवनात वावरणारी व्यक्ती त्यांना स्वच्छता हवी असते. त्यामुळे विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांना चारित्र्याच्या संदर्भात फार जपावे लागते.त्यात यशस्वी झालेले तावून सुलाखून निघालेले लोक सोन्या चांदी सारखे उजळ असतात.तशी सराफ सरांची जीवन शैली होती.महात्मा गांधींनी सप्त पाप कर्मावर प्रकाश टाकलेला आहे त्यात नीतिमत्तेला खूप महत्व आहे.साने गुरूजी गांधीजींचे शिष्य होते. त्यांच्या चारित्र्यावर कुठलाही डाग नव्हता. प्राचार्य सराफ सरांवर त्या उच्च विचारसरणीचा प्रभाव होता.त्या नुसारच ते जगले.

असे जे आपणापाशी असे जे वित्त वा विद्या सदा ते देतील जावे जगाला प्रेम अर्पावे.ही भावना त्यांनी अखेर पावेतो जपली.अमळनेरला जे मराठी साहित्य संमेलन झाले त्यात त्यांनी उत्साहाने भाग घेतला.अनेक लोक विविध क्षेत्रात कार्यरत असतात.नियत वयोमानानुसार निवृत्त झाल्यावर आपल्या जीवनाचे भाग ध्येय संपल्याची भावना त्यांच्या मनात निर्माण होते.त्यामुळे ते शरीराने आणि मनानेही निष्क्रीय होतात थकून जातात.सराफ सर मात्र या मानसिकते पासून जाणीवपूर्वक दूर राहिले.जोवर शरीर साथ देते तोवर काम करीत रहायचे असा त्यांचा जीवन व्यवहार होता.उत्साह त्यांच्या जगण्यातून ओसंडून वाहत असे.गुलाबराव बापू यांच्या नंतर साने गुरूजी कर्मभूमी स्मारकाच्या उभारणीच्या प्रयत्नांचा भाग म्हणून ते सतत चिंतेत असत.माझ्या हयातीत ते पूर्ण झाले पाहिजे किंवा त्यास स्वरूप आले पाहिजे अशी त्यांची इच्छा होती.शासन काही करणार नसेल तर आपण लोकांच्या सहभागातून स्मारक उभारू निराश व्हायचे नाही असे सातत्याने ते सांगत असत.या स्मारकाचा ध्यास घेतलेले अविनाश पाटील,चेतन सोनार,गोपाळ नेवे,दर्शना पवार आणि कार्यकर्त्यांच्या पाठिशी ते ठामपणे उभे होते.स्वतःच्या मिळकतीतून त्यांनी या कामासाठी नेहमीच मदत केली.त्यांना कौटुंबिक स्वास्थ्य चांगले लाभले.कुटुंब प्रमुख म्हणूनही त्यांनी सक्षमपणे जबाबदारी पार पाडली.

पुणे विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य, बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले.एकंदरच त्यांच्या कामाचा आवाका आणि उरक व्यापक होता.जेव्हा केव्हा अमळनेरातील व्यक्तिमत्त्वांचा आणि संस्थांचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा सराफ सरांचे नाव आणि कर्तृत्व त्यात हमखास असेल माणूस जन्माला येतो जगतो बहुतांश लोक रोजच्या जीवन व्यवहाराशी झगडतच जगत असतात त्यांच्या जगण्याचा आवाका तेवढाच असतो.त्यांचा परिवार सोडला तर समाज त्यांची फारशी दखल घेत नाही. कारण वर्तुळाच्या बाहेर त्यांचे जग नसते.मात्र आपल्या जगण्याची,कर्तृत्वाची छाप सोडून इतिहासाच्या पानांवर आपली छाप सोडून जाणारे मोजकेच असतात अशा दुर्लभ व्यक्तिमत्वात सराफ सरांचा उल्लेख करावा लागेल.साने गुरूजी कर्मभूमी स्मारकाचे काम पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरणार आहे..त्यांना अखेरचा सलाम.



## भारतीय सैन्यात वाघाडी गावातील भूमिपुत्राची सुभेदारपदावर पदोन्नती

**शिरपूर, दि.१९- शिरपूर तालुक्यातील वाघाडी या छोट्याशा गावातून शिक्षण घेत आपल्या मेहनत, जिद्द आणि कर्तृत्वाच्या जोरावर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणारे अमोल युवराज महाले यांची वयाच्या अवघ्या ३२ व्या वर्षी भारतीय सैन्यात सुभेदार पदावर पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या यशामुळे वाघाडी गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

अमोल महाले यांचे वडील युवराज महाले हे भारतीय सैन्यात सेवेत होते. वडिलांकडून मिळालेली देशसेवेची प्रेरणा, शिस्त आणि संस्कार त्यांनी आपल्या जीवनात जपले. त्यांच्या आई शोभाबाई युवराज महाले यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. आईच्या निधनानंतर कुटुंबावर मोठे दुःख कोसळले; मात्र या प्रतिकूल परिस्थितीतही कुटुंबीयांनी अमोल यांच्या शिक्षणाला आणि स्वप्नांना भक्कम साथ दिली.

ग्रामीण भागातील छोट्याशा गावातून शिक्षण घेत अमोल महाले यांनी एमएस्सी(अप्लाईड जिऑलॉजी) ही पदव्युत्तर पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी डीआरडीओ मध्ये प्रोजेकट सायंटीस्ट म्हणून काम केले. संरक्षण संशोधन क्षेत्रातील महत्त्वाच्या कामांचा अनुभव घेत असताना त्यांनी आपल्या तांत्रिक ज्ञानाची वेगळी ओळख निर्माण केली. तसेच इस्त्रो संबंधित प्रकल्पांमध्येही त्यांनी काम केले असून भूविज्ञान, रिमोट सेन्सिंग, जीआयएस आणि उपग्रह तंत्रज्ञानाशी संबंधित क्षेत्रात योगदान दिले आहे.संशोधन आणि तांत्रिक क्षेत्रात काम केल्यानंतर देशसेवेची प्रेरणा आणि वडिलांकडून मिळालेली सैनिकी परंपरा पुढे नेत त्यांनी भारतीय सैन्यात प्रवेश केला. सैन्यातील सेवेदरम्यान त्यांनी कर्तव्यनिष्ठा, शिस्त, तांत्रिक कौशल्य आणि नेतृत्वगुणांच्या जोरावर विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या.वाघाडीच्या मातीतून सुरू झालेला हा प्रवास डीआरडीओ मधील प्रोजेक्ट सायंटीस्ट, इस्त्रो संबंधित प्रकल्पांतील योगदान आणि त्यानंतर भारतीय सैन्यातील सुभेदार पदापर्यंत पोहोचला आहे. वयाच्या अवघ्या ३२व्या वर्षी मिळवलेले हे यश त्यांच्या जिद्द, मेहनत आणि कुटुंबीयांच्या संस्कारांचे फलित मानले जात आहे.आई-वडिलांनी पाहिलेली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी अमोल महाले यांनी शिक्षण, संशोधन आणि देशसेवा या तिन्ही क्षेत्रांत सातत्याने मेहनत घेतली. त्यांच्या या यशामुळे वाघाडी तसेच शिरपूर तालुक्यातील युवकांसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.अमोल महाले यांच्या सुभेदारपदावरील पदोन्नतीबद्दल कुटुंबीय, मित्रपरिवार, माजी सहकारी, ग्रामस्थ आणि परिसरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सैनिकी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालयात एच.आय.व्ही. अभियानास प्रतिसाद

**शिरपूर, दि.१९- शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या एचआयव्ही एड्स जनजागृती अभियानांतर्गत रेड रिबन क्लब, राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एचआयव्ही एड्स जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले.**

महाविद्यालयातील अभियानाच्या उद्घाटन सत्रास प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा, प्राचार्य डॉ. एन. जी. हासवाणी, उपप्राचार्य डॉ. ए. ए. शिरखेडकर, डॉ. प्रितम जैन, ग्रामीण रुग्णालय, थाळनेर येथील आय.सी.टी.सी. समुपदेशक विकास काशीनाथ साबरे व आय.सी.टी.सी. तंत्रज्ञ रविंद्र महिरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी विकास साबरे व रविंद्र महिरे यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही एड्सचा प्रसार, संसर्गाचे मार्ग, प्रतिबंध, उपचार, गैरसमज तसेच आवश्यक आरोग्यविषयक काळजी याबाबत मार्गदर्शन केले. एचआयव्ही एड्सविषयी असलेल्या गैरसमजुती दूर करून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला. ज्ञानातून जागृती, जागृतीतून प्रतिबंध आणि प्रतिबंधातून निरोगी समाजाची निर्मिती या विचाराला केंद्रस्थानी ठेवून विद्यार्थ्यांना विषय समजावून सांगण्यात आला. या अभियानात १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हर्षल पाटील यांनी केले.

## महिला व गर्भवतींसाठी आरोग्य शिबिर डॉ.सुप्रिया कुलकर्णींनी केली तपासणी



**धुळे, दि.१९- : स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने देवरे हॉस्पिटल, दत्त मंदिर चौक, देवपूर, धुळे येथे महिला व गर्भवती मातांसाठी आयोजित करण्यात आलेले विशेष स्त्रीरोग व प्रसूती आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरीत्या संपन्न झाले. शिबिराला महिला रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ६० गर्भवती महिलांची तपासणी करण्यात आली.**

शिबिरामध्ये स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ डॉ. सुप्रिया कुलकर्णी यांनी गर्भवती महिलांची तपासणी करून गर्भावस्थेतील नियमित तपासण्यांचे महत्त्व, योग्य आहार, औषधोपचार, आवश्यक रक्त तपासण्या, सोनोग्राफी तसेच सुरक्षित प्रसूतीसाठी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. गर्भवती मातांसाठी आवश्यक असलेल्या एएनसी प्रोफाईल अंतर्गत सीबीसी, रक्तगट, लघवी तपासणी, रक्तातील साखर व थायरॉईड तपासणी यांसारख्या तपासण्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने पॅप स्मीअर तपासणीबाबतही जनजागृती व मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिरादरम्यान गर्भधारणेतील रक्तक्षय, उच्च रक्तदाब, मधुमेह, थायरॉईडसंबंधी समस्या तसेच इतर जोखमींचे वेळेत निदान करण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. प्रत्येक गर्भवती महिलेच्या आरोग्यस्थितीनुसार आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला आणि गरजेनुसार पुढील तपासणी व उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

महिलांना प्रसूती, सिझेरियन शस्त्रक्रिया तसेच दुर्बिणीद्वारे करण्यात येणाऱ्या स्त्रीरोग शस्त्रक्रियांसाठी सुविधा उपलब्ध असल्याची माहितीही देण्यात आली.गर्भावस्थेत नियमित तपासणी आणि योग्य वेळी निदान केल्यास आई व बाळाच्या आरोग्याशी संबंधित अनेक गुंतागुंती टाळता येऊ शकतात. प्रत्येक गर्भवती मातेला दर्जेदार आणि वेळेवर आरोग्यसेवा मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला. शिबिराला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आयोजकांनी समाधान व्यक्त केले. एकाच शिबिरातून ६० गर्भवती मातांपर्यंत आरोग्यसेवा व आरोग्यविषयक मार्गदर्शन पोहोचल्याने हा उपक्रम यशस्वी ठरला.

## पिंप्री शिवारात बोअरवेलची केबल चोरी; शेतकऱ्यांना आर्थिक फटका

**शिरपूर, दि.१९ (प्रतिनिधी)- पिंप्री शिवारात सोमवारी रात्री अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घालत तब्बल अकरा ते बारा बोअरवेलच्या विद्युत केबल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. एकाच रात्री अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील केबल चोरीला गेल्याने परिसरातील शेतकरी वर्गात चिंता आणि संतापाचे वातावरण आहे.***

चोरीचा झटका रोहित काशिनाथ गिरासे, एकनाथसिंग ठाणसिंग गिरासे, नागोसिंग इद्रसिंग गिरासे, महेंद्रसिंग भगवानसिंग गिरासे, इद्रसिंग हिरामण गिरासे, कोमलसिंग उत्तमसिंग राजपूत, संग्रामसिंग भीमसिंग गिरासे, राजेंद्र उत्तम राजपूत, योगेंद्रसिंग एकनाथसिंग सिसोदिया, महेंद्रसिंग एकनाथसिंग सिसोदिया आणि इंदुबाई उमेशसिंग राजपूत या शेतकऱ्यांना बसला आहे. बोअरवेलच्या केबल चोरीमुळे शेतातील सिंचन व्यवस्था विस्कळीत झाली असून, पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. केबल नव्याने खरेदी करून बसविण्याचा अतिरिक्त आर्थिक भारही शेतकऱ्यांवर पडणार आहे.

घटनेची माहिती पोलिस पाटील जयपालसिंह गिरासे यांनी थाळनेर पोलीस ठाण्यास कळविली असून, पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, शेतशिवारात रात्रीच्या वेळी पोलीस गस्त वाढविण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

शेतशिवारात एकाच रात्री मोठ्या प्रमाणावर केबल चोरी होणे ही गंभीर बाब असून, या घटनांमागे संघटित टोळीचा सहभाग आहे का? याचीही चौकशी होणे आवश्यक आहे. पोलिसांनी परिसरातील संशयित हालचाली, उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज तसेच यापूर्वीच्या चोरीच्या घटनांचा तपास करून चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी बांधवांकडून होत आहे.अतीवृष्टी मुळे शेतकरी मेटाकुटीला आला असून केबल चोरी झाल्यामुळे नविन तांब्याची केबलचा सुमारे १७०० ते १८०० खर्च तर मोटार काढण्यासाठी चैनकप्पा ऑपरेटर यांची २५०० रूपये मजुरी आणि पिकांचे नुकसान वेगळे होते. वर्षाकाठी दोन ते तीन वेळा केबल चोरी होते. पोलीस प्रशासनाचे कडक कारवाई करावी अशी अपेक्षा आहे. कारण अशा चोरट्यावर वचक हवाच. अशा प्रतिक्रिया मनोज राजपूत, शेतकरी यांनी दिली.

पान १ वरुन

### गोळीबारावरून राजद आक्रमक

मागण्या मांडल्या जातील, असे त्यांनी सांगितले.

**तेजस्वी यादव पुन्हा रस्त्यावर**

तेजस्वी यादव यांनी यापूर्वी २०२१ मध्ये बिहार सरकारच्या एका प्रस्तावाविरोधात आंदोलन केले होते. त्यानंतर तब्बल पाच वर्षांनी ते पुन्हा मोठ्या निषेध मोर्चाचे नेतृत्व करत रस्त्यावर उतरले. आंदोलन दरम्यान त्यांनी अटकेची भीती नसल्याचे सांगत सरकारविरोधात आक्रमक भूमिका कायम ठेवली. विद्यार्थी आंदोलन, बेरोजगारी आणि सिवानमधील गोळीबाराच्या घटनेवरून राजदने सरकारला घेरल्याने बिहारमधील राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

### एक वर्षाची मातृत्व रजा

रजा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकार महिलांच्या सक्षमीकरणावर आणि सामाजिक कल्याणावर भर देत असल्याचे सांगत मंत्री सार्थककुमार यांनी या निर्णयाचे समर्थन केले. सरकारी महिला कर्मचाऱ्यांना मातृत्वाच्या काळात अधिक वेळ मिळावा आणि त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तमिळनाडूमध्ये महिला कर्मचाऱ्यांच्या मातृत्व रजेच्या कालावधीत गेल्या काही वर्षांत टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात आली आहे. यापूर्वी नव्वद दिवसांची मातृत्व रजा देण्यात येत होती. मात्र, २०११ मध्ये ती सहा महिन्यांपर्यंत वाढविण्यात आली. त्यानंतर २०१६ मध्ये रजेचा कालावधी नऊ महिने करण्यात आला. जुलै २०२६ मध्ये मातृत्व रजा वाढवून ३६५ दिवस करण्यात आली. या निर्णयाची अंमलबजावणी सभागृहात घोषणा झाल्याच्या तारखेपासून करण्यात येणार असून, यासंदर्भातील सविस्तर सरकारी आदेश वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून जारी करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## आयुक्तांकडून विभाग प्रमुखांना मार्गदर्शक सूचना



**(पान १ वरुन)** ठेवणे, गर्दी नियंत्रणासाठी आवश्यक मनुष्यबळ व सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देणे, गणेशमूर्ती विक्री स्टॉल व मंडपांसाठी आवश्यक परवानग्या देणे तसेच जाहिरात फलक व होर्डिंगसाठी नियमानुसार परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. गणेश मंडळे व मूर्ती विक्री स्टॉलसाठी ऑनलाइन अर्ज व परवानगी प्रणाली कार्यान्वित करण्याचेही निर्देश देण्यात आले.

नागरिकांच्या सोयीसाठी टोल फ्री/हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित ठेवणे, मनपा मुख्यालयात स्वागत कक्ष सुरू करणे, गणेश मंडळे, मुख्य रस्ते, विसर्जन मार्ग, घाट व सार्वजनिक ठिकाणी नियमित स्वच्छता राखणे तसेच मार्गावरील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याबाबत संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या.

मिरवणुकीदरम्यान वाहतूक सुरळीत राहण्यासाठी पोलीस विभाग व वाहतूक शाखेशी समन्वय साधून आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बैठकीत सोपविण्यात आलेल्या सर्व जबाबदाऱ्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून गणेशोत्सव काळात नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याचे आदेश आयुक्तांनी दिले.

### प्रकाश में आज जाल




सनी देअल तबु अमरीशपुरी रीमा सेन अनुपम खेर मुकेश ऋषी आशिष विधार्थी







### शब्दकोडे क्रमांक : २४३६



**आडवे शब्द :** १.लॉटरी ३.वस्तू ठेवण्यासाठी किंवा पॅकिंगसाठी पुठ्ठ्याचा बॉक्स ४.अत्यंत पराक्रमी,धाडसी किंवा शूर स्त्री ७.फिरण्यासाठी किंवा मनोरंजनासाठी काढलेली छोटी ट्रिप ९.एखादी गोष्ट आत्मसात असणे किंवा माहीत असणे ११.प्रसिद्ध दोहे रचणारे मध्ययुगीन संत-कवी १२.स्मृती जाणे किंवा एखादी गोष्ट लक्षात न राहणे १३.मोठा खडक १४.गाढव आणि घोडा यांच्या संकरापासून तयार झालेला प्राणी १५.भिंत-हिंदी शब्द १६.क्रीडा १७.कळशी १९.मालाची झालेली विक्री २१.हुशार २३.उजाड २४.तालात छेडलेली वाद्य २६.विजय २७.अधिकार २९.खोबऱ्याची बदललेली चव जिरे: स्वयंपाकात फोडणीसाठी वापरला जाणारा सुगंधी मसाला ३२.रक्त ३३.वारसा ३६.आवश्यकता ३८.मुंबईतील एक प्रसिद्ध रेल्वे स्टेशन देवीचा जागर होतो तो उत्सव ४२.ग्राम, खेडेगाव ४३.एक मुलीचे नाव ४६.समुद्र ४७.सुदृढ ४८.लत ४९.अविरत ५०.प्रत्येक **उभे शब्द :** १.करण्यास सुलभ २.चित्रकाराने कुंचल्याने चितारलेली छवी ३.खूप आत ४.चंद्रावरील मोठा खळगा ५.एका मागोमाग उभे राहणे ६.गेलेला काळ ८.शिव ९.हिंदीत-प्रभाव १०.देखरेख ११.अशा वस्तू किंवा पदार्थ ज्यांचा वापर संपला आहे आणि जे निरुपयोगी म्हणून टाकून दिले जातात१२.लग्न १४.एक उभयचर जीव १६.मजल १८.फटाका १९.अख्खा मसाल्यातील एक पदार्थ २०.प्रतिसाद २१.पंजाब प्रांतातून वाहणारी एक नदी २२.सोबत २४.मार्ग २५.कैफ २८.कविता रचणारी स्त्री ३०.देश ३१.कोळसा वापरून चालवली जाणारी रेल्वे ३४.वन ३५.ऐट ३७.स्वर ३८.एक प्रसिद्ध भारतीय बॅटमिंटन पटू '* नेहवाल'४०.निगा ४१.त्रासलेला ४४.जेवणावळ ४५.अनामत रक्कम,आगाऊ किंवा सुरक्षित राहण्यासाठी ठेवण्यास दिलेली वस्तू वा रक्कम ४६.सप्त ४७.नादमय आवाज

### शब्दकोडे क्रमांक : २४३५ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज | हा | ज | | फु | क | ट | | मो | ह | | ची |
| वा | ल | | दा | | रा | क | ट | | ल | ह | र |
| ब | | ना | म | दा | र | | र | वि | वा | र | |
| | गा | व | | म | ना | चे | | का | | क | डी |
| भा | न | | ना | | मा | | म | स | ल | त | |
| | स | ह | म | त | | स | नी | | डा | | म |
| | म्रा | | | ल | ग | दा | | पो | ख | र | ण |
| | ज्ञी | | नी | म | | ब | ल | क | | म | का |
| क | | दा | र | | सु | हा | स | | मा | मा | |
| व | री | स | | फ | रा | र | | प | री | ण | य |
| ड | | बो | ल | | व | | क | व | च | | म |
| सा | व | ध | | ल | ट | का | | न | | ची | न |

## पान १ वरुन

### बदली सफाई कामगार कायम होणार

एकनाथ शिंदे यांच्यासह नगरविकास विभागाकडे सुमारे वर्षभरापासून पाठपुरावा सुरू ठेवला होता.आमदार अग्रवाल यांनी मुंबईत काल (ता.१८) उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह नगरविकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यावेळी आ.अग्रवाल यांनी या बदली सफाई कामगारांविषयी सविस्तर माहिती देत चर्चा केली. उपमुख्यमंत्री शिंदे यांनीही गांभीर्याने हा विषय समजून घेतला आणि या विषयी त्वरित कार्यवाही करत या बदली सफाई कामगारांना धुळे महापालिकेत रिक्त व मंजूर पदांवर कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. याबाबत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.या निर्णयामुळे गेली कित्येक वर्षे महापालिकेच्या कायम सेवेत सामावून घेण्याबाबत स्वप्न पाहणाऱ्या सर्व बदली सफाई कामगारांना अखेर न्याय मिळाला आहे. या निर्णयाबद्दल आमदार अग्रवाल यांनी आनंद व्यक्त करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत.

### सोशल मीडियावर ग्रा.पं.अधिकारी..

पारोळा तालुक्यातील शिवरे येथे ग्रामसभेदरम्यान ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांच्या दुर्दैवी मृत्यूची घटना घडल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. सोशल मीडियावरील चुकीच्या माहितीमुळे निर्माण होणारा मानसिक ताण आणि त्याचे गंभीर परिणाम याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे पाटील यांनी म्हटले आहे.लोकशाहीमध्ये प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे; मात्र या स्वातंत्र्याचा वापर जबाबदारीने होणे आवश्यक आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करून एखाद्या व्यक्तीच्या जीविताला धोका निर्माण होणार असेल, तर अशा प्रकारांना आळा घालणे गरजेचे आहे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.गावातील पोलीस पाटील तसेच संबंधित पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून अशा सोशल मीडिया अकाउंट्स, ग्रुप डमिन आणि रील्स तयार करून चुकीची माहिती प्रसारित करणाऱ्यांवर लक्ष ठेवावे. वस्तुस्थितीची खातरजमा न करता ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करणाऱ्या किंवा बदनामीकारक माहितीचा प्रसार करणाऱ्यांवर नियमानुसार कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी अखिल भारतीय सरपंच परिषदेचे राजेश पाटील, वडगाव चे सरपंच मनीषा खैरनार, बाबरे सरपंच संतोष राजपूत सरपंच मानसी देवरे नेर सरपंच गायत्री देवी जयस्वाल आर्मी सरपंच निलेश सोनवणे गरताड सरपंच रूपाली पाटील तिखी सरपंच कविता श्रीराम पाटील सरपंच भारती पाटील यांच्यासह तालुक्यातील अनेक सरपंच यावेळी निवेदन देण्यासाठी उपस्थित होते.

### चौधरी यांना जामीन मंजूर

आली आहे.प्रकरणातील तथ्यांची माहिती असलेल्या कोणत्याही व्यक्तीला धमकी, प्रलोभन किंवा आश्वासन देऊन न्यायालय अथवा पोलिसांसमोर माहिती देण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयतक करू नये, अशीही अट न्यायालयाने घातली आहे. जामिनाची प्रक्रिया संबंधित न्यायालयात पूर्ण करण्यात येणार असून आदेशाची प्रत संबंधित कारागृह प्रशासनाला ई-मेलद्वारे पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विजय चौधरी यांच्या कथित ऑडिओ क्लिप मुळे राज्यात खळबळ उडाली होती. त्याने संयोजक पदाचे राजीनामा दिला होता. त्यानंतर पक्षाने त्यांना पक्षातून मुक्त केले.

### रस्त्यासाठी ग्रामस्थ आक्रमक

संबंधित ठेकेदार काम करण्यास तयार असल्याचे सांगितले जात असतानाही प्रशासकीय पातळीवरील अडथळ्यांमुळे काम रखडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने या प्रकरणाची दखल घेऊन रस्त्याचे काम सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली.मागणी मान्य न झाल्यास आगामी सार्वत्रिक निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा नेवाडे येथील भगवान बुद्धा जाधव, अशोक शिवदास बागुल, चंद्रशेखर खंडेराव पवार, निखिल जयवंत साळुंखे, जितेंद्र तुकाराम जाधव, चेतन प्रकाश साळुंखे, स्वप्नील अमृत साळुंखे, रंगराव बाबूलाल पवार, किशोर ढोमन पवार, राजेंद्र लहू साळुंखे, पिरण साळुंखे, विलास हरिश्चंद्र साळुंखे, साळुंखे, राजेंद्र पंढरीनाथ साळुंखे, प्रवीण हिरालाल साळुंखे, कुणाल जोशी, चेतन प्रकाश पवार, सुनिता विलास पवार, यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर निदर्शने करतांना दिला आहे.

### दोंडाईचामध्ये अटकेत

माहितीनुसार त्यांनी गुन्ह्याच्या तपासाला वेग दिला. दोंडाईचा शहरातील उड्डाण पुलाखाली कॉपर केबल जाळतांना गोरख सुखराम ठाकरे-भिल (वय २२), गणेश शिवन ठाकरे-भिल (वय १८), दीपक नानाभाऊ मालचे (वय २७, सर्व रा. वणी ता. शिंदखेडा) यांना मुद्देमालासह ताब्यात घेत त्यांची चौकशी केली. चौकशीअंती संशयितांनी गुन्हयाची कबुली देत मुद्देमाल काढुन दिला.१३ हजार रुपयांच्या केबलसह एक लाख रुपयांची मोटरसायकल क्र.एम एच ३९/एटी- २५५१ असा एकुण १ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपअधीक्षक सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक सोनवणे, उपनिरीक्षक इमरान खान, हवालदार संजय सोनवणे, हिरालाल सुर्यवंशी, प्रविण निकुंभे, निलेश हालोरे, निलेश धनगर यांनी कारवाई केली.

### डोळ्याच्या रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रीया

नामांकित आणि उपचार व शस्त्रक्रीयेचे खात्रीशीर ठिकाण आहे. जवाहर मेडीकल फाउंडेशन येथे येथे आलेल्या प्रत्येक रुग्णांवर अतिशय नाममात्र दरात तसेच शासकीय योजनेत उपचार केले जातात. त्यामुळे जवाहर मेडीकल फाउंडेशन हे गोरगरीब आणि तळागाळातील रुग्णांसाठी आधाराचे केंद्र बनले आहे. यासाठी जवाहर मेडीकल फाउंडेशनचे चेअरमन मा.आ. कुणाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक रुग्णांची विशेष काळजी घेतली जाते. शासनाच्या नियम व अटीनुसार येथे प्रत्येक शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला जातो. याठिकाणी विविध विभागनिहाय तज्ज्ञ डॉक्टर कार्यरत असून अत्याधुनिक यंत्रसामुग्रीमुळे आजाराचे अचूक निदान व उपचार होत असते. नुकतेच जवाहर मेडीकल फाउंडेशन येथे दोन्ही डोळ्यांत मॅच्युअर कॅटरॅक्ट तसेच हायपोथायरॉईडीझम असलेला दोंडाईचा येथील रुग्ण उचारासाठी दाखल झाला होता. तसेच तामसवाडी येथील दोन्ही डोळ्यांना मोतीबिंदू व मधुमेह असलेलाही रुग्ण दाखल झाला होता. या दोन्ही रुग्णांना शस्त्रक्रीयेपूर्वी डोळ्याने स्पष्टपणे दिसत नव्हते. शस्त्रक्रीयेसाठी दाखल झालेल्या या दोन्ही रुग्णांवर जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने यशस्वी शस्त्रक्रीया केली. त्यामुळे आता त्यांना आपल्या डोळ्यांनी स्पष्टपणे दिसू लागेल तसेच दैनंदिन कामकाजात त्यांना कोणताही अडथळा निर्माण होणार नाही. यशस्वी शस्त्रक्रीयेमुळे या रुग्णांनी व त्यांच्या नातेवाईकांनी आनंद व कृतज्ञता व्यक्त केली आहे. रुग्णांचे तसेच वैद्यकीय पथकाचे मा.आ.कुणाल पाटील,सचिव डॉ.ममता पाटील,डॉ.शैलेंद्र पाटील, अधिष्ठाता डॉ.नितीन कुलकर्णी यांनी कौतुक केले आहे. शस्त्रक्रीया यशस्वी करण्यासाठी डॉ.सुरेंद्र वडगावकर,भूलतज्ज्ञ डॉ.कोल्हे यांनी परिश्रम घेतले त्यांना डॉ.केतकी भट, डॉ.आर.व्ही पाटील आणि डॉ.पवार यांचे सहकार्य मिळाले.

### महिंदळेतून पाईप चोरणाऱ्या संशयितास..

याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल आहे.पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांनी पोलीस पथकाला रवाना केले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन, सी.सी.टी.व्ही. फुटेज व तांत्रिक विश्लेषणाअंती संशयित फैसल महंमद रंगरेज, (वय-२३, रा.१२५, मिल्लतनगर, वडजाई रोड, धुळे) यास दि. १६ ऑगस्टला गुन्हयाच्या तपासकामी ताब्यात घेत सखोल विचारपुस केली असता त्याने गुन्हयाची कबुली देत मुद्देमाल काढुन दिला. एकुण ३ लाख ५ हजार रुपयांचे चोरी केलेले पाईप हस्तगत केले. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपअधीक्षक सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक धनंजय पाटील, पोलीस अंमलदार नितिन चव्हाण, मनोज बावीस्कर, संदीप शिंदे, प्रविण धनगर, प्रकाश माळी यांनी कारवाई केली.

## पान १ वरुन

### सर्वसाधारण सभेत चोवीस विषय मंजूर

विभागास रोपवाटिका उभारणी व वृक्षारोपणासाठी उपलब्ध करून देणे तसेच ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचा विषय, आणि स्वच्छता विभागाकडील वाहनांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी वार्षिक निविदा काढून त्यावर होणाऱ्या खर्चास मंजुरी देण्याचा विषय अशा दोन विषयांना सभेत नामंजूर करण्यात आले.सभेत विविध नगरसेवकांनी शहरातील समस्यांवरून प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले.उपनगराध्यक्षा सौ. माधवी पाटील यांनी शहरातील मोकाट गुरांच्या वाढत्या उपद्रवावर प्रशासनाला जाब विचारला. पाणीपुरवठा सभापती प्रदीप ठाकरे यांनी पाणीपुरवठा विभागाच्या ढिसाळ कारभाराबाबत अधिकाऱ्यांना धारेवर धरले.प्रतोद ज्ञानेश्वर चौधरी यांनी,आगामी गणेशोत्सव व इतर सणांच्या पार्श्वभूमीवर मिरवणूक मार्गावरील सर्व पथदिवे दुरुस्त करावेत आणि विद्युत रोषणाई योग्य प्रकारे करावी, अशी सूचना विद्युत व पथदिवे विभागाला दिली.

नगरसेविका भारती चव्हाण यांनी शहरातील सर्व गल्ली आणि कॉलनी भागात नामदर्शक फलक लावण्याची व सरदार पटेल स्मारकाची रंगरंगोटी करण्याची मागणी केली. कल्पेश पटेल यांनी घरपट्टी व पाणीपट्टीबाबत नागरिकांना दिलासा देणारा योग्य निर्णय घेण्याची मागणी लावून धरली. बांधकाम सभापती संतोष वाल्हे यांनी बांधकाम विभागातील अभियंता व कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारावर जोरदार ताशेरे ओढले. नगरसेवक सागर मराठे यांनी भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नावरून आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला, तर मुनेश जगदेव यांनी नगरपालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी नाममात्र भाडेतत्त्वावर दिलेल्या पालिकेच्या इमारती व जागा नगरपालिकेने त्वरित ताब्यात घ्याव्यात, अशी ठाम मागणी केली.

या सभेत भाजपचे सभागृह प्रतोद ज्ञानेश्वर चौधरी, संतोष वाल्हे, प्रदीप ठाकरे,ललित छाजेड, हरीश पाटील, भावना कदम,लताबाई शिवदे, ड. दानिश पठाण,सागर मराठे ,वसीम तेली,भारती चव्हाण,मुनेश जगदेव,ममता पवार आदी सदस्यांनी विविध विषयांवर चर्चेत सहभाग घेतला.आज झालेल्या सभेत संपूर्ण सभेदरम्यान नगराध्यक्ष व सभेचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी जास्त न बोलता शांततेत कामकाज चालवण्यावर भर दिला ज्यामुळे त्यांची ही भूमिका चर्चेचा विषय ठरली. सभेच्या शेवटी नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### खुल्या जागांवर वृक्षलागवड करणार

नवापूर शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता उपलब्ध मोकळ्या जागांचा योग्य पद्धतीने वापर करून त्याठिकाणी पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य देण्याचा पालिकेचा प्रयतक आहे. वृक्षलागवडीमुळे शहरातील हरित क्षेत्र वाढण्यासोबतच प्रदूषण कमी करण्यास, पर्यावरणाचा समतोल राखण्यास आणि शहराचे सौंदर्य वाढविण्यास मदत होणार आहे.कॉलनी परिसरातील मोकळ्या जागांवर वृक्षलागवड करून त्याठिकाणी कंपाऊंड उभारण्यात येणार असल्याने या जागांचे संरक्षणही होणार आहे. तसेच संबंधित परिसरात भविष्यात विविध विकासकामे करण्यासाठीही या उपक्रमाचा फायदा होणार असल्याचे नगराध्यक्ष जयवंत जाधव व मुख्याधिकारी डॉ. मयुर पाटील यांनी सांगितले.शहराच्या विकासासोबतच पर्यावरण संवर्धनाचा समतोल साधण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असून, नागरिकांनीही लावण्यात येणाऱ्या वृक्षांचे संगोपन व संरक्षण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन पालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

### पन्नास हजार लांबविले

प्लास्टिकच्या पिशवीत ठेवली होती.बँकेत पैसे भरण्याच्या प्रक्रिये दरम्यान प्लास्टिकच्या पिशवीला अज्ञात व्यक्तीने धारदार वस्तूने कापून त्यातील ५० हजार रुपये चोरून नेल्याचे लक्षात आले. चोरीस गेलेल्या रकमेध्ये ५०० रुपयांच्या १०० नोटा असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पिशवीतील पैसे कमी असल्याचे लक्षात आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. सदर घटना १८ ऑगस्ट रोजी घडलेली असताना पोलिसांनी १९ ऑगस्ट रोजी दुपारी १.३० वाजता गुन्ह्याची नोंद घेण्यात आली.बँकेच्या परिसरातच ही चोरी झाल्याने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांचा शोध घेऊन चोरीला गेलेली रक्कम परत मिळवावी,अशी मागणी करण्यात येत आहे. सुभाष बळीराम पाटील,वय ७०,रा. आंबापूर रोड, रामदेवजी बाबा नगर प्लॉट क्रमांक २२,साक्री यांनी साक्री पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.साक्री पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ०२४४/ २०२६ दाखल करण्यात आला असून,भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### पोलिसांचा ॲक्शन प्लॅन

पर्यायी मार्गांचा वापर, गर्दीच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून देखरेख ठेवण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.प्रत्येक गणेश मंडळाने दिवस-रात्र अशा दोन्ही वेळेस स्वयंसेवक नियुक्त करावेत. मंडळाच्या परिसरात सुरक्षितता राखण्याबरोबरच आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत उपलब्ध होईल, याची दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले. आक्षेपार्ह पोस्ट, बॅनर किंवा देखावे सादर करू नयेत, तसेच सामाजिक तेढ निर्माण होईल अशा कोणत्याही प्रकाराला थारा देऊ नये, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

बैठकीदरम्यान जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या गणेश मंडळांच्या प्रतिनिधींनी आपल्या अडचणी, सूचना व अपेक्षा मांडल्या. गणेशोत्सव काळात जिल्हा पोलीस दलाला आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाहीही मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.बैठकीस महावितरणचे कार्यकारी अभियंता गायधनी, नंदुरबार नगरपालिका बांधकाम विभागाचे गावीत, नंदुरबार शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदिप पाटील, उपनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमोल सातोदकर, जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार खेडकर, शहर वाहतूक शाखेचे स.पो. नि. जगदीश गावीत यांच्यासह जिल्हाभरातील गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### ना.रावलांच्या उपस्थितीत उद्या महावॉकॅथॉन

जयकुमार रावल यांच्या हस्ते होणार आहे. अशी माहिती मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता राजाराम झुरावत यांनी दिली आहे.या कार्यक्रमासाठी राज्याचे पणन व राज्यशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या प्रमुख उपस्थितीत स्थळ : जिल्हा क्रिडा संकुल गोंदूर एअरपोर्टरोड, वाडीभोकर, देवपूर, धुळे वेळ सकाळी ६:०० वाजता सुरवात होईल. या कार्यक्रमासाठी आ. अमरिशभाई पटेल, खा.डॉ. शोभा बच्छाव, ॲड. गोवाल पाडवी, मनपा महापौर मायादेवी परदेशी, आ.किशोर दराडे, आ. सत्यजित तांबे, आ. काशिराम पावरा, आ. गावित, आ.अनुप अग्रवाल, आ.राघवेंद्र पाटील, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, कार्यकारी अभियंता राजाराम झुरावत हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे. असे आवाहन राजाराम झुरावत यांनी केले आहे.




स्व. श्रीमती
हसुमतीबेन भूपेंद्रभाई शेठ
उठावना
दिनांक: 20 अगस्त 2026, गुरुवार
समय: सुबह 11:00 बजे
शीतलनाथ जैन मन्दिर
संजय भूपेंद्र भाई शेठ
दीपक भूपेंद्र भाई शेठ
उत्तमचंद रतीलाल शेठ
महासुख रतीलाल शेठ
चुनीलाल रतिलाल शेठ
नोट • शोक बैठक
ता: 20/21/22 अगस्त 2026
समय: शाम। 7 से 9 बजे तक
स्थल: प्लॉट नंबर 13अ, प्रभु सिटी, पारोला रोड धुले
गजानन फरसाण हाऊस

द्वितीय पुण्यस्मरण



स्व.राजेंद्र उत्तमचंद कटारीया
(मृत्यू दि.२०/०८/२०२४)
तुमचं असणं सर्वकाही होतं.
आयुष्यातील एक ते सुंदर पर्व होतं.
आज सर्वकाही असल्याची जाणीव आहे
पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे
तुमच्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली व सुमनांजली
- शोकाकुल -
श्रीमती.कल्पना राजेंद्र कटारीया
प्रितेश अनिल श्रॉफ– प्रियंका प्रितेश श्रॉफ
भावेश मिठुलाल मुथा– प्रिती भावेश मुथा
सुजित नरेंद्र जैन– पायल सुजित जैन
युग, चारवी, भुवी, निरवी, लियांश
महेश पाटील व चिराग मेहता
व समस्त कटारीया परिवार, धुळे
फर्म- प्रियंका ट्रेडर्स धुळे

प्लॉट विकणे
3900 sq.ft.
15 mtr DP road front २ रोड कॉर्नर प्लॉट विकणे. अरूण कुमार वैद्य नगर
-: संपर्क :-
7391055331

पाहिजेत
रेडिमेड दुकान कामासाठी हुशार, मुले पाहिजेत. आकर्षक पगार
-: त्वरीत भेटा :-
श्री सत्यनारायण ड्रेसेस
ग. नं. २, जैन मंदिराजवळ, धुळे फो. नं. २३६४८५

शेती विक्री
भाडणे शिवार, स. नं. ५४४/१, साक्री - पिंपळनेर रोड, नागाईकडे जाणारा रस्ता कॉर्नर येथील ९१ आर शेत विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क साधावा.
-: संपर्क :-
मो. 9850195001
9823189430

पाहिजेत
हुषार व अनुभवी सेल्समन पाहिजे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड ॲण्ड होजीअरी
गल्ली नं.२, अकबर चौक, धुळे
भेटण्याची वेळ ४ ते ७
9422286958

पाहिजेत
- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्टोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

पाहिजेत
लॉजिंगसाठी अनुभवी व ज्ञान असलेले मॅनेजर पाहिजेत. वय ५५ रात्री साठी
-: संपर्क :-
हॉटेल प्रितम पॅलेस
साक्री रोड, महापालिके समोर धुळे
मो. 9423613000

विकणे आहे
स्नेहनगर मधील महानगरपालिका स्विमींग टॅन्क समोरील दोन रोड कॉर्नर १६५२० चौ.फूट जागा व १२००० चौ.फूटाचे बांधकाम हॉस्पीटल, लॉज, मंगल कार्यालय इ.साठी उपयुक्त
योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
-: संपर्क :-
9823007351

पाहिजेत
फर्निचर व इलेक्ट्रॉनिक शोरुमसाठी खालील पदे भरणे आहेत.
१) सेल्समन : (मुले-२,मुली-२)
२) शोरुम मॅनेजर : १ जागा
३) कॉम्प्युटर ऑपरेटर : २ जागा
४) हेल्पर : २ जागा
५) कारागीर : २ जागा
६) मार्केटींगसाठी सेल्समन: २ जागा
(मॉड्युलर फर्निचर फिटींगचा अनुभव आवश्यक)
भेटण्याची वेळ दु. ३ ते ५ संध्या.
-: संपर्क :-
श्री पद्मा ट्रेडींग कॉर्पोरेशन एल.एल.पी.
संत डोंगरे महाराज नगर,
कॉटन मार्केट समोर, पारोळा रोड, धुळे
फोन : 02562 299361, मो. : 8623899361.

Requirements:
Position : District Sales & Marketing Executive
- Experience in AAC Blocks/Construction Material/Cement Industry
- Own Two-Wheeler & Valid Driving Licence
- Strong Sales & Customer Handling Skills
- Ability to Achieve Sales Targets
Location : Dhule District
Salary : Attractive+Incentive
Contact/WhatsApp: 9226817232

पाहिजेत
गॅस सिलेंडर वाटपसाठी हुशार होतकरू डिलेव्हरी बॉय पाहिजे. आकर्षक पगार
-: संपर्क :-
तिरुपती गॅस एजन्सी
गल्ली नं.२, पुर्ती बिल्डींगच्या मागे, धुळे
7875556589
8554982900

घर भाड्याने देणे
अशोक नगर मधील ३ रुमचे सर्व सोयीनीयुक्त असलेले घर भाड्याने देणे आहे. नोकरीस प्राधान्य
-: संपर्क :-
9881733643

godrej
27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे
1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बॅंक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
59 वर्षांपासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

पाहिजेत
Tally A/C करिता पार्टटाईम लेडीज/जेंटस् पाहिजे.
-: संपर्क :-
दि भारत एजन्सीज
पारोळा रोड, धुळे

विकणे आहे
2 BHK Flat विकणे आहे.
मोहाडी रोड, पेट्रोल पम्पाजवळ, धुळे शासकीय डेअरी समोर, समता नगर, धुळे
-:Broker:-
L.G. Property
मो. 9793093955

पाहिजेत
होलसेल मेडिकल दुकानात कामासाठी हेल्पर- २
माल काढण्यासाठी -२
माल पोहचविण्यासाठी -३
होतकरू मुले लावणे आहेत
समक्षभेटा-
-: संपर्क :-
राजा एन्टरप्रायजेस
टॉवर बागे जवळ जे.बी.रोड, धुळे


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०